# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड,
परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


विद्यापीठ वरिष्ठ अधिकाऱ्यांची आढावा बैठकीबाबत.

## परिपत्रक

जा.क्र.२०२३/आढावा बैठक/साप्रवि-७ दिनांक :१७/१०/२०२३

विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी,कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ अंतर्गत प्रशासकीय अधिकारी, कार्यालय प्रमुख यांची आढावा बैठक दर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातील मंगळवारी सकाळी ११.०० वाजता प्रशासकीय इमारत, Symposium Hall (सभागृह क्र.१८), वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे आयोजित करण्यात येणार आहे. तदनुषंगाने प्रशासकीय अधिकारी, कार्यालय प्रमुख यांनी सदर बैठकीस उपस्थित राहावे.

संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता, संचालक संशोधन, संचालक विस्तार शिक्षण, नियंत्रक व विद्यापीठ अभियंता यांनी आपल्या अधिनस्त असलेले सर्व कार्यालयीन समस्या दुर करण्याकरिता महिन्याच्या ३० तारखेच्या अगोदर समस्या संबंधित विषय/टिपण्या संकलीत स्वरुपात एकत्रीतरित्या या कार्यालयास हार्ड व सॉफ्ट कॉपीमध्ये पाठविण्याची व्यवस्था करावी. परंतु, सदर विषय अथवा टिपण्यामध्ये कार्यालायाशीच निगडीत असलेले विषय बैठकीत सादर करण्यात येतील. वैयक्तीक अधिकारी/कर्मचारी यांच्या समस्या संबंधित विषय बैठकीत सादर केल्या जाणार नाहीत. याची दक्षता घावी.

मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने...

(पु.क.काळे) १७/१०/२३
कुलसचिव

प्रत :

१) संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण, नियंत्रक, विद्यापीठ अभियंता, उपकुलसचिव (आस्था), उपकुलसचिव (विद्या) व सहायक कुलसचिव (साप्रवि) वनामकृवि, परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल सर्व कार्यालय, अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्देशनास आणून देण्यात यावे.

२) प्रभारी अधिकारी, विद्यापीठ संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

३) मा.कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव.